दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २५६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१६ डिसेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर तारांकित, अतारांकित प्रश्नांबाबत

## सर्व शासकीय विभागांनी अभ्यासपूर्वक माहिती तयार ठेवावी : ना.उदय सामंत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**लवकरच नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याशी संबंधित असलेल्या तारांकित/अतारांकित प्रश्नांबाबत सर्व शासकीय विभागांनी अधिकृत माहिती अभ्यासपूर्वक तयार ठेवावी, असे राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचित केले.**

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त तारांकित/अतारांकित संदर्भाबाबतची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अलिबाग उपवनसंरक्षक अधिकारी आशिष ठाकरे, रोहा उपवनसंरक्षक अधिकारी आप्पासाहेब निकत, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील तसेच विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख तसेच कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचित केले की, अधिवेशन काळात कोणीही मुख्यालय सोडू नये. आपापल्या विभागाची इत्यंभूत अधिकृत माहिती तयार करावी. ज्या विभागाकडे एखाद्या विषय/संदर्भाबाबतची विचारणा होईल, त्यावेळी त्या विषय/संदर्भाबाबतची सविस्तर माहिती तात्काळ मिळेल यासाठी संबंधित विभागांनी सतर्क राहावे.

कोणत्याही परिस्थितीत रायगड जिल्ह्याची प्रतिमा खराब होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेणे आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. हिवाळी अधिवेशन काळात रायगड जिल्ह्याविषयी मांडल्या जाणाऱ्या प्रश्नांना योग्य उत्तरे सादर करून जिल्ह्याची प्रतिमा चांगली ठेवण्याचा एकत्रित प्रयत्न करूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून जिल्हा प्रशासन आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कबड्डी चषक स्पर्धेच्या प्रथम क्रमांक विजेत्या संघाना (महिला गट- प्रथम - कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल, पुरुष गट- प्रथम - पांडवादेवी रायवाडी, तालुका अलिबाग, आकर्षक चषक, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक (प्रथम क्रमांक - रुपये ३१ हजार) पालकमंत्री सामंत यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

नुकतीच पोलीस विभागाची कोकण विभागीय क्रीडा स्पर्धा-२०२२ पार पडली. या स्पर्धेत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने २२४ गुण मिळवून सर्वसाधारण विजेते पद (जनरल स्पोटर्स चॅम्पियनशिप) पटकावले. याकरिता पालकमंत्री सामंत यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे आणि पोलीस खेळाडूंचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले.



## महिलेच्या हत्येने पनवेल परिसरात खळबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील धामणी गावाकडे जाणाऱ्या रोडवर गाढी नदीच्या पुलाखाली नदीच्या पात्रात एका २५ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळून आला असून सदर महिलेची हत्या करण्यात आली आहे. याबाबत पनवेल तालुका पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.



सदर महिलेचे अंदाजे वय २५ वर्षे, उंची १५० से.मी., बांधा मध्यम, चेहरा काळवंडलेला, केस काळे-भोर असून, अंगात हिरव्या रंगाचा पंजाबी ड्रेस, त्यामध्ये हिरव्या रंगाचा फुल बाह्याचा कुडता, त्यावर गुलाबी रंगाची फुलाची व सोनेरी रंगाच्या टिकल्यांची डिझाईन तसेच हिरव्या रंगाची सलवार कमरेस डिझाईन आहे. दोन्ही हातावर कोपरापर्यंत मेहंदी काढलेली, डाव्या हाताच्या व दोन्ही पायांच्या बोटास नेल पॉलिश लावलेले, डाव्या हाताच्या पंजाच्या वरील भागावर आय लव्ह यु मॉम आणि डॅड असे गोंदलेले, तिच्या पायात काळ्या रंगाच्या चप्पल असून त्यावर शो म्युझियम असा मार्क आहे.

या महिलेची कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन तिचा ओढणीने व हाताने गळा दाबून तिला ठार मारल्याचे प्राथमिक स्वरुपात दिसून येत आहे. याबाबत तसेच या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि अनिल पाटील यांनी केले आहे.

## पागोटे खाडीत केमिकल युक्त पाणी सोडल्याने मृत माशांचा खच

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पागोटे - कुंडेगाव खाडीत काल हजारो मासे मृत झाल्याचे दिसून आले. मच्छिमारांच्या उपजीविकेचे साधन असणाऱ्या या खाडीमध्ये परिसरातील कंपन्यांचे केमिकल युक्त पाणी सोडल्यामुळे मासे मृत्युमुखी पडल्याचा आरोप या खाडीत मच्छिमारी करणाऱ्या कोळी बांधवांनी केला आहे.

उरण तालुक्यात अनेक लहान मोठ्या खाड्या आहेत. या खाड्यांमध्ये अत्यंत चवदार मासळी मिळते. अनेक मासेमार या खाड्यांमध्ये मासेमारी करून आपली उपजीविका करतात. मात्र द्रोणागिरी विभागात असणाऱ्या पागोटे - कुंडेगाव खाडीत आज हजारो मृत माशांचा खच पडल्याचे दिसून आला आहे. यामध्ये बोइठ, घोया, कोळंबी, वरा, करपाली, चिवनी, तांब अशा विविध प्रकारच्या माशांचा समावेश आहे. खाडीतील मासे मृत्युमुखी पडल्यामुळे मासेमारीवर उपजीविका करणाऱ्या मच्छीमारांचे अत-ोनात नुकसान झाल्याने शासकीय यंत्रणांनी केमिकलचे पाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रवी पाटील यांनी केली आहे.



## चतुर्थ वार्षिक मुल्यांकनाच्या मालमत्ता करामध्ये व दरामध्ये कोणतीही वाढ प्रस्तावित नाही : वैभव गारवे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ (१) (२) अन्वये कर्जत मधील मालमत्ता धारकांना नोटीस पाठविल्या आहेत, या ह्या नोटिशीमुळे कर्जतकरांच्या मनात टॅक्स वाढणार की काय अशा प्रकारची भीती निर्माण झाली आहे त्यामुळे याबाबतची चर्चा कर्जत शहरात तसेच सोशल मीडियावर होताना दिसत आहे याबाबत कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी चतुर्थ वार्षिक मूल्यांकनाच्या मालमत्ता करांमध्ये व दरामध्ये कोणतीही वाढ प्रस्तावित नाही असे सांगितले आहे.



कर्जत नगर परिषदेतर्फे पाठविण्यात आलेल्या नोटीस मध्ये आपल्या घराचे कर आकारणी मध्ये तसेच केलेल्या फेरफार बाबत किंवा नावात काही चूक असल्यास किंवा मालमत्ता संबंधित आपली कोणती हरकत असल्यास सदर कारणे नमूद करून ती लेखी स्वरूपात मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांच्याकडे २५ डिसेंबर २०२२ पर्यंत किंवा तत्पूर्वी पाठवावी व त्याची पोच पावती घ्यावी वरील मुदतीत आपल्याकडून लेखी हरकत अर्ज न आल्यास आलेली प्रस्तावित कर आकारणी आपणास मंजूर आहे असे समजण्यात येऊन आपल्या नावे नगरपरिषदेने केलेली प्रस्तावित कर आकारणी कायम करण्यात येईल असे नोटिसीमध्ये नमूद केले आहे त्यामुळे सध्या कर्जत नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या मनात धडकी बसली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायत नगरी अधिनियम १९६५ से कलम १२४ अन्वये कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील मालमत्तांच्या मालमत्ता कराचे सन २०२३-२०२४ वर्षा पर्यंतचे चतुर्थ वार्षिक मूल्यांकनाचे काम सुरु असून सदर चतुर्थ वार्षिक मुल्यांकनाच्या मालमत्ता करामध्ये दरामध्ये कोणतीही वाढ प्रस्तावित नाही,ज्या मालमत्तांचे बांधकाम क्षेत्रामध्ये बदल/वापरात बदल झालेल्या मालमत्तांसाठीच वाढ होणार आहे. तसेच मालमत्ता बंद होत्या किंवा मोजमाप करण्यास नकार देण्यात आलेला अशाच मालमत्तेचे मान मोजमाप बाहेरून घेण्यात आले आहे. अशा मालमत्ता धारकांनीनी काही आक्षेप असल्यास त्वरित हरकत नोंदवावी, अशा मालमत्ता संदर्भात पुन्हा प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन व समक्ष मोजमापे घेवून त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येइल.

याबाबतीत आपले घराचे कर आकारणी मध्ये तसेच केलेल्या फेरफारबाबत किंवा नावात काही चूक असल्यास किंवा मालमता संबंधित आपली कोणतीही हरकत असल्यास सदर कारणे नमूद करून ती लेखी स्वरुपात मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्याकडे २५ डिसेंबर २०२२ पर्यंत किंवा तत्पूर्वी पाठवावी व त्याची पोचपावती घ्यावी.

वरील वर्षाकरिता केलेली कर आकारणी पाहण्यासाठी आपणास कार्यालयीन वेळेत स्वतः च्या मालकीचे घर व जागेवरील कर आकारणी कर्जत नगरपरिषद कार्यालयात कर विभागात पहावयास मिळेल. ज्या मालमत्ता धारकांना ११९ ची नोटीस मिळाली नसेल अशा मालमत्ता धारकांनी नगरपरिषद कार्यालयात येवून ती घ्यावी असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे.

## गोवर प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेस सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य शासनाकडील सुचनांनुसार विशेष गोवर रुबेला लसीकरण मोहिमेस पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक १५ डिसेंबर २०२२ आणि २५ जानेवारी २०२३ या दोन टप्यामध्ये राबविण्यात येणार असून या मोहिमेची पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबर २०२२ व दुसरी फेरी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत नियोजित करण्यात आली आहे. त्यानूसार आजपासून १५० टिमच्या साहाय्याने घरो-घरी जाऊन गोवर प्रतिबंधात्मक लसीकरणास पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरूवात झाली आहे.

या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, ज्या बालकांचे लसीकरण राहीले आहे अशा नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने पुढे येऊन आपल्या बालकांचे गोवर- रुबेला लसीकरण पूर्ण करून घेण्याचे आव-ाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. तसेच आपल्या परिसरात गोवर-रूबेलाचे रूग्ण आढळल्यास महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास जरूर कळवावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय रोज १५० टिमच्या साहाय्याने १४ हजार ७३५ घरांचे सर्वे क्षण याअंतर्गत केले जाणर आहे. यासाठी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. नियमित लसीकरण वेळापत्रकानुसार गोवर रुबेला लसीचा पहिला डोस ९ महिने ते १२ महिने या वयात, तर दुसरा डोस १६ महिने ते २४ महिने या वयात घेणे अपेक्षित आहे.

या अनुषंगाने बुधवारी सिटी टास्क फोर्सची बैठक आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. याबैठकित आशा वर्करर्स, एएनएम, जीएनएम यांनी योग्य तऱ्हेने सर्वेक्षण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.




## महाडमध्ये सुषमा अंधारे यांचा निषेध

**दै.रायगड नगरी । महाड**

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या व उपनेत्या सुषमा अंधारे यांनी हिंदू देवदेवता तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा राज्यभर सर्वत्र जाहीर निषेध होत आहे. महाड शहरामध्येही बाळासाहेबांची शिवसेना महिला आघाडी सुषमा अंधारे यांच्या विरोधात आक्रमक झाली असून आज

गुरुवार दि.१५ डिसेंबर रोजी महाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या महिला आघाडी तर्फे सुषमा अंधारे यांच्या फोटोला जोडे मारून जाहीर निषेध नोंदवण्यात आला. यावेळी सुषमा अंधारे यांच्या विरोधात घोषणाबाजी करून त्यांना या महाडच्या पवित्र व ऐतिहासिक भूमीत कदापि पाऊल ठेवू देणार नाही असा निर्धार या महिला आघाडीच्या वतीने यावेळी करण्यात आला.



बाळासाहेबांची शिवसेना महिला आघाडी शहर संघटिका विद्या देसाई व माजी सभापती सपना मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली केल्या गेलेल्या या निषेध आंदोलनात आसावरी पाटेकर, उपशहर संघटिका ज्योती निकम, रोहिणी मराठे, सिद्धी मोरे, माजी सभापती सपना मालुसरे, उपशहर संघटिका शाहीन चिपळूणकर तालुका प्रमुख प्रतिभा पवार यांसह माजी नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, माजी नगरसेवक सुनिल अगरवाल, युवा सेना तालुका प्रमुख रोहीदास अंबावले, सिध्देश पाटेकर, सावंत आदी उपस्थित होते.

यावेळी विद्या देसाई यांनी एका पक्षातून दुसर्या पक्षात उड्डाण करणार्या अंधारे यांना आमचे दैवत मारूती रायांच्या उड्डाणा बद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार नाही असे सांगत त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला. तर माजी सभापती सपना मालुसरे यांनी दलभद्री महिला असा अंधारे यांचा उल्लेख करीत हिंदू धर्माची भगवी पताका फडकवणार्या साधु संतां विरोधात व वारकरी सांप्रदाया विरोधात गरळ ओकणार्या सुषमा अंधारे यांना महाड मध्ये पाऊल ठेवू देणार नाही असा इशारा दिला. विभाग प्रमुख अनंत सावंत यांनी बिन अभ्यासू अंधारे यांनी ज्या पक्षाच्या व्यासपीठावरून हिंदू संस्कृती व साधु संतां विरोधात बेताल वक्तव्य केले आहे त्या पक्षाकडून त्यांचेवर कारवाई झाली नाही तर वारकरी सांप्रदाय त्या पक्षाचाही निषेध करील व त्यांना सहकार्य करणार नाही असे सांगितले.

## भव्य सभेने रामेश्वर आंग्रे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब : बबनदादा पाटील

### महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या करंजाडे मध्ये धडाडल्या तोफा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

येत्या १८ डिसेंबर रोजी पनवेल तालुक्यातील दहा ग्रामपंचायतींमध्ये निवडणूक होत आहे. सर्वत्र प्रचार अंतिम टप्प्यात आलेला असून तालुक्यात महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे वर्चस्व दिसून येत आहे. करंजाडे येथे थेट सरपंच पदाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रामेश्वर बबन आंग्रे आणि अकरा सदस्यांच्या प्रचारार्थ भव्य प्रचार सभेचे आयोजन बुधवार दिनांक १४ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या सभेमध्ये महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या तोफा धडाडल्या.



पनवेल उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क नेते बबनदादा पाटील, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे विद्यमान सदस्य भाई आर सी घरत, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाई राजेंद्र पाटील,शेकाप चे माजी पनवेल तालुका चिटणीस नारायण शेठ घरत, पनवेल तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी आदी प्रमुख मान्यवरांच्यासह महाविकास आघाडीचे नेते यावेळी मंचावर उपस्थित होते. करंजाडे सेक्टर ४ येथील टाटा पॉवर केंद्रासमोरील भूखंडावर या भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते.

बबनदादा पाटील यांनी आपल्या घणाघाती भाषणात महाविकास आघाडीने गरजेपोटी बांधलेल्या घरांना नियमित करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचा पुनरुच्चार केला तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे कैवारी असणारे लोकनेते दि बा पाटील यांचे नाव देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठराव केला असल्याचे सांगितले. रामेश्वर आंग्रे यांनी केलेल्या विकास कामांच्या जोरावर येथील जनता आम्हाला पुन्हा निवडून देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर आजच्या सभेला असणारी उत्स्फूर्त उपस्थिती याने रामेश्वर आंग्रे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले असल्याचे त्यांनी सांगितले.

आर सी घरत यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या थापेबाज कारभारावर सडकून टीका केली, करंजाडे मध्ये वारंवार पक्ष बदलत नागरिकांशी गद्दारी करणाऱ्या भाजपाच्या नेत्यांवर त्यांनी तोंडसुख घेतले. तर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाई राजेंद्र पाटील यांनी राष्ट्रसंतांचा, थोर पुरुषांचा अवमान करणाऱ्या भाजपाला तुम्ही मते देणार आहात का? असा परखड सवाल उपस्थित केला. यावेळी मंचावर कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, शिवसेनेच्या पनवेल तालुका महिला आघाडी प्रमुख मेघाताई दमडे, राष्ट्रवादीचे नारायण खर्जे, राजकुमार पाटील संदीप म्हात्रे, पनवेल शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड,काँग्रेस युवानेते विक्रांत घरत, पनवेल अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या माजी संचालिका माधुरी गोसावी, कविता मकवाना आदी मान्यवर उपस्थित होते.

# विकासाची नवी वाट

महाराष्ट्रातील ७० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला मंगळवारी मंत्रिमंडळाच्या उपसमितीने हिरवा कंदील दाखवला आहे. ज्या तडफेने विरोधकांनी लाखो कोटी रुपयांचे प्रकल्प इतर राज्यांनी पळवल्यावर सरकारवर टीका केली होती; तितकेच मन मोठे करून त्यांनी या गुंतवणुकीचेही खरे तर स्वागत करायला हवे. तशी कृती आदर्श लोकशाही व्यवस्थेत अपेक्षित असते. नव्या राजकीय युगात विरोधकांनी सरकारवर काहीही झाले तरी टीकाच करावी व सरकारनेही विरोधकांच्या विधायक सल्लयांना केराची टोपली दाखवावी; असाच शिरस्ता आहे. राज्यातून एक लाख साठ हजार कोटींचा 'वेदान्त फॉक्सकॉन'चा सेमीकंडक्टर प्रकल्प गुजरातला गेला व विरोधकांनी शिंदे-फडणवीस सरकारला धारेवर धरले. त्याच्या आगे-मागे २२ हजार कोटींचा टाटा एअरबसचा लढाऊ विमानांचा प्रकल्प, वैद्यकीय उपकरण पार्क, बल्क ड्रग्ज पार्क, अपारंपरिक ऊर्जा निर्मिती उद्योगांचे क्लस्टर असे अनेक प्रकल्प राज्यातून गेल्याने सरकारची पंचाईत झाली. अर्थात, सरकारनेही हे उद्योग आधीच्याच सरकारच्या काळात दुसऱ्या राज्यांमध्ये गेल्याचे ठेवणीतले उत्तर तयार ठेवलेच होते. हे उत्तर देण्यासाठी मागील सरकारमधील उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व या सरकारमधील उद्योग मंत्री हिरीरीने पुढे येत होते, हे अधिक गमतीशीर होते. महाराष्ट्र देशातील उद्योग क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर होते व आजही आहे; हे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हा म्हटले होते, ते सत्यच आहे. देशात होणाऱ्या एकंदर थेट परदेशी गुंतवणुकीच्या ३० टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात होते. देशाच्या पूर्ण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा २० टक्के आहे. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २० टक्के उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते. ज्यांना काम देता येईल, असे कौशल्य असलेल्या देशभरातील लोकांपैकी ६८ टक्के लोक महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राच्या विकासाचा हा आलेख एकट्या काँग्रेसच्या, वा एकट्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या वा एकट्या महाविकास आघाडीच्या काळात चढा झालेला नाही. महाराष्ट्रात असलेले पायाभूत सुविधांचे जाळे, उद्योगांना पोषक वातावरण, कुशल व औद्योगिक तंट्यांपासून दूर असणाऱ्या कामगारांची मुबलकता या गोष्टींमुळे देश व जगभरातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यात रस असतो. मात्र, तीन दशकांपूर्वी देशात जी परिस्थिती होती, तशी आता राहिलेली नाही. काळाच्या ओघात देशातील प्रत्येक लहान-मोठ्या, विकसित-अविकसित अशा सगळ्याच राज्यांना गुंतवणूक व त्यायोगे होणारा विकास यांचे गणित आता नीट समजू लागले आहे. आपल्या राज्यातून उद्योग इतर राज्यात जात असतानाच मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान पुण्यात येऊन महाराष्ट्रातील उद्योगपतींना तेथे येऊन गुंतवणूक करण्याचे आवाहन करून गेले होते. त्याच काळात ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनीही मुंबईत येऊन अनेक उद्योपतींना त्यांच्या राज्यात या, हव्या त्या सुविधा पुरवतो, असे आश्वासन दिले. त्यामुळे आता महाराष्ट्र व देशाची आर्थिक राजधानी मुंबई यांच्या जिवावर महाराष्ट्रात आपोआप गुंतवणूक होत राहील, असे मानण्याचे कारण नाही. दिवंगत अर्थमंत्री अरुण जेटली यांनी याला स्पर्धात्मक संघराज्यवाद, असे संबोधले होते. विकासाची गंगा अडवून आपला प्रदेश अधिकाधिक सुजल सुफल करण्याचा प्रत्येक राज्याला अधिकार आहे. त्या स्पर्धेत टिकायचे असल्यास उद्योगपूरक धोरणे व त्यातील सातत्य या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. राजकारणातील आरोप-प्रत्यारोप व कुरघोड्या या होतच राहणार. मात्र, अर्थकारणात राजकारण आणले की त्याचे परिणाम तात्काळ उद्योग क्षेत्रावर व त्यामुळे राज्यातील सामान्य जनतेवर होत असतात, हे कालच्या आणि आजच्याही राज्यकर्त्यांनी समजून घ्यायला हवे. मागील सरकारचे निर्णय रद्द करणे अथवा महत्त्वाच्या निर्णयांना स्थगिती देऊन त्यांना चौकशी समित्यांच्या लालफितीत गुंतवणे यातून राज्याचेच नुकसान होत असते. त्यामुळे सध्या राज्यात असलेले शिंदे-फडणवीस सरकार काय व विरोधात असलेली महाविकास आघाडी काय; त्यांनी राज्यात होणाऱ्या गुंतवणुकीबाबत तरी राजकारण होणार नाही, याचा अलिखित करार केल्यास जनतेचा दुवाच मिळेल. आता मंत्रिमंडळाच्या उपसमितीने १३ विविध प्रकल्पांना मंजुरी दिली असून ७० हजार कोटी रुपयांच्या या गुंतवणुकीतून राज्यातील जवळपास ५५ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. तसेच, मुंबई, पुणे, नाशिक या सोनेरी त्रिकोणाच्या पलीकडे जाऊन विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली यांच्यासारख्या जिल्ह्यांमध्ये जवळपास २० हजार कोटींची गुंतवणूक होते आहे, हे जास्त महत्त्वाचे व आशादायी चित्र आहे. देशातील काय वा राज्यातील काय विकासाची फळेच ज्या विभागांना कधी दिसलेली नाहीत; अशा भागांमध्येच अधिकाधिक गुंतवणूक होऊन समतोल साधला गेल्यास खऱ्या अर्थाने विषमतेच्या विरोधात ठोस पाऊल उचलले गेले, असे म्हणता येईल. त्या दृष्टिकोनातून शिंदे-फडणवीस सरकार अभिनंदनास पात्रच ठरते.

# प्रधानमंत्री टी.बी.मुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय मित्र बनविण्यासाठी औद्योगिक वसाहतींना भेटी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्रधानमंत्री टी.बी.मुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय मित्र बनविण्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वंदनकुमार पाटील व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे यांनी औद्योगिक वसाहतींना भेटी दिल्या. दि.१४ डिसेंबर २०२२ रोजी खालापूर येथील वावोशी प्राथमिक आरोग्य केंद्र,व खोपोली अंतर्गत असलेल्या औद्योगिक वसाहतींना भेटी देऊन त्यांना निक्षय मित्र बनवून क्षय रुग्णांना त्यांचे उपचार सुरू असेपर्यंत दत्तक घेऊन, त्यांना पोषक आहार देण्यासाठी माहिती देण्यात आली.

गोदरेज कंपनी लि. चे श्री. तानाजी चव्हाण यांनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर मंजूरीकरिता दिला आहे, तसेच जास्तीत जास्त क्षयरुग्णांना निक्षय मित्र साहाय्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले असून अत्याधुनिक तंत्रज्ञानासह असलेली ढ्रीपररीं मशीनही मंजूर होईल, असेही त्यांनी सांगितले. या मशीनचा उपयोग खालापूरवासियांना होईल. खालापूरमधील क्षयरुग्णांना तपासणीसाठी व अहवालासाठी इतरत्र कोठेही जाण्याची आवश्यकता भासणार नाही, आता ती सुविधा जवळच्याच आरोग्य केंद्रात उपलब्ध होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

याबाबत जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वंदनकुमार पाटील व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रसाद रोकडे यांनी त्यांचे आभार मानले. उत्तम फ्लोर मिल ही कंपनी देखील निक्षय मित्र बनून जवळपास ५० क्षयरुग्णांना पोषक आहाराचे किट पुरवठा करून देईल, असे आश्वासन कंपनीचे मानव संसाधन प्रमुख श्री.महादेव हजारे, महाव्यवस्थापक श्री.विकास आत्तरडे, श्री. सचिन जाधव यांनी दिले. इनोफोसिथ इंडिया टेक्नॉलॉजी लि.यांनी १०० क्षयरुग्णांना दत्तक घेऊन निक्षय मित्र म्हणून नोंदणी केली. लवकरच एका कार्यक्रमात या सर्व क्षयरुग्णांना पोषक आहार किटचे वाटप करण्यात येणार आहे, असे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री.सरोज बेहरम यांनी सांगितले. यावेळी डॉ.वंदनकुमार पाटील यांनी या सर्वांचे मनः पूर्वक आभार मानले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक श्री.एस. के.पंडित, आरोग्य सेवक श्री.एस.एल.थवई, जिल्हा पी.पी.एम.समन्वयक श्री.सतिश दंतराव, श्री.कृष्णा पाटील, श्री.महेंद्र पिंगळे व श्री.योगेश म्हेशे आदि उपस्थित होते.

# नवी मुंबई परिमंडळ क्षेत्रात पोलीस निरीक्षक यांच्या सर्वसाधारण बदल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई परिमंडळ क्षेत्रातील पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांचे आदेश जाहीर झाले आहे. यासंदर्भात अतितातडीने ९ पोलीस निरीक्षकांच्या आणि २१ पोलीस कर्मचाऱ्यांच्या वाहतूक शाखेत बदलीचे आदेश जाहीर झाले.

बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये महेश पाटील यांची तळोजा वाहतूक शाखेतून नेरुळ पोलीस ठाण्यात, सुनील कदम यांची तुर्भे पो. स्थानकातून तळोजा वाहतूक शाखेत, सतीश जाधव यांची विशेष शाखेतून गुन्हे शाखेत, विमल विडये यांची खारघर पोलीस ठाण्यातून एपीएमसी वाहतूक शाखेत, संजय जोशी यांची पनवेल शहर पोलीस ठाण्यातून तुर्भे पोलीस ठाण्यात, पृथ्वीराज घोरपडे यांची एनआरआय पोलीस ठाण्यातून सीबीडी वाहतूक शाखेत, जगदीश शेरकर यांची सीबीडी वाहतूक शाखेतून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बदलीचे आदेश जाहीर झाले आहेत. त्यानुसार काहींनी पदभार सुद्धा स्वीकारले आहेत.

## राज्यात हिंदुजा समूह करणार ३५ हजार कोटींची गुंतवणूक

# उद्योजकांना सर्व सुविधा देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रात उद्योगांनी गुंतवणुकीसाठी पुढे यावे या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या आवाहनाला जगभरातील विविध उद्योजकांसह उद्योग समूहांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. आज, हिंदुजा समूहाने महाराष्ट्रात विविध ११ क्षेत्रांमध्ये सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा राज्य शासनाबरोबर सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करुन त्याचे आदानप्रदान करण्यात आले.



'वर्षा' निवासस्थानी झालेल्या बैठकीस हिंदुजा ग्रुपचे जी. पी. हिंदुजा, अशोक हिंदुजा, प्रकाश हिंदुजा, माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी हिंदुजा समूहाचे स्वागत करुन महाराष्ट्रात गुंतवणुकीला प्राधान्य दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. अत्यंत कमी कालावधीत हा सामंजस्य करार होत असल्याचे सांगून महाराष्ट्रातील भूमिपुत्र म्हणून हिंदुजा समूहाने या गुंतवणुकीसाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल समूहाचे कौतुक केले.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, गेल्या दोन दिवसांपूर्वी शासनाने ७० हजार कोटींच्या गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली असून त्यातून ५५ हजारांपेक्षा अधिक तरुणांना रोजगार मिळणार आहे. सरकारी विभागांमध्ये ७५ हजार नोकऱ्या आम्ही उपलब्ध करुन देत आहोत, मात्र खाजगी क्षेत्रातही आता या गुंतवणुकीमुळे नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत, तरुणांच्या हाताला काम मिळेल, त्यांच्या जीवनात परिवर्तन येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

नुकतेच नागपूर-मुंबई दरम्यानच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी दरम्यानच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण झाले आहे, हा फक्त महामार्ग नाही तर तो एक 'गेमचेंजर प्रोजेक्ट' असल्याचेही त्यांनी सांगितले.

देशात सर्वाधिक स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून उद्योगांच्या परवान्यांसाठी एक खिडकी योजना सुरु केली आहे. लवकरच यासंदर्भातील कायदा आणणार असून उद्योगांना इतर प्रोत्साहनात्मक सुविधा सरकार देत आहे.

महाराष्ट्रात गुंतवणुकीला पोषक वातावरण असून कुशल मनुष्यबळ देखील उपलब्ध आहे, उद्योजकांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य सरकार आणि प्रशासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्रात रोजगाराच्या संधी निर्माण करतानाच राज्याच्या विकासाला चालना देण्यासाठी हिंदुजा समूहाने राज्यात ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार आज केला आहे. नवीकरणीय ऊर्जा, माध्यमे आणि मनोरंजन, ग्रामीण आर्थिक विकास, सायबर सुरक्षा, व्यावसायिक ऑटोमोबाईल्स, बँकिंग- फायनान्स, आरोग्य, पायाभूत सुविधा, शिक्षण, उत्पादन आणि नव तंत्रज्ञान या ११ क्षेत्रात हा उद्योग समूह गुंतवणूक करणार आहे.

अतिशय कमी वेळेत हा सामंजस्य करार आज होत असल्याबद्दल हिंदुजा समूहाचे जी. पी. हिंदुजा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धन्यवाद दिले. मी महाराष्ट्रातील असून आम्ही १९१४ पासून इथे राहतो, राज्याच्या प्रगतीसाठी, समाजसेवेसाठी शिक्षण, आरोग्य, निर्मिती उद्योग, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रात काम करून, अमेरिका, इंग्लंड येथील उद्योजक मित्रांना देखील महाराष्ट्रामध्ये गुंतवणुकीसाठी आणणार असल्याचे सांगून अतिशय कमी वेळेत विविध निर्णय घेऊन सरकार गतीने काम करीत असल्याबद्दल श्री. हिंदुजा यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे कौतुक केले. आज झालेल्या सामंजस्य करारांची गतीने अंमलबजावणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कोस्टल रोडवरील पुलाच्या दोन पिलरमधील अंतर दुप्पट करण्याचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विकासकामे करताना भूमिपूत्रांवर अन्याय होणार नाही ही आमची भूमिका आहे. मुंबईतील कोस्टल रोडचे काम करताना वरळी कोळीवाड्याजवळील पुलाच्या दोन पिलरमधील अंतर ६० वरून १२० मीटर करण्याच्या निर्णयाची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. याभागातील कोळीबांधवांच्या मागणीनुसार हा निर्णय घेण्यात आला असून अत्याधुनिक तंत्रज्ञान, मनुष्यबळाची संख्या वाढवून कोस्टल रोड प्रकल्प वेळेत पूर्ण करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल आणि कोळी बांधव उपस्थित होते. वरळी जवळून कोस्टल रोड सी लिंकला जोडला जात आहे. तेथील क्लीव्ह लॅण्ड बंदर जवळ दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या कनेक्टरचे काम सुरू असून त्या पिलरमधील अंतर वाढविण्याची मागणी स्थानिक कोळी बांधवांची होती. यासंदर्भात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कोळीबांधवांची बैठक देखील घेतली होती. त्यामध्ये यामागणी बाबत तज्ज्ञांची समिती नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार सात सदस्यांची समिती नियुक्त केली होती. समितीने महिनाभरात अहवाल देत अंतर ६० वरून १२० मीटर करण्याचे प्रस्तावित केले होते. त्यानुसार आज झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी कोळीबांधवांची अंतर वाढविण्याची मागणी मान्य करीत या पिलरमधील अंतर १२० मीटर करण्याचा निर्णय जाहिर केला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, कुठल्याही विकास प्रकल्पाला गती देताना स्थानिकांची नाराजी असू नये अशी आमची भूमिका आहे. आम्ही लोकहिताच्या निर्णयाला नेहमीच प्राधान्य देत आहोत. त्यानुसार कोळीबांधवांनी केलेल्या मागणीवर सकारात्मक विचार करून हा निर्णय घेतला आहे. पिलरमधील अंतर वाढवल्यानंतर कोळी बांधवांच्या बोटी त्याभागातून सहजपणे ये जा करू शकतील.

कोळीबांधवांच्या हिताला प्राधान्य असल्याने दोन्ही पिलरमधील अंतर वाढविण्याचा निर्णय घेतल्याचे सांगतानाच प्रगत तंत्रज्ञान, अधिकचे मनुष्यबळ वापरून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी कोळीवाड्यांचे सीमांकन, पुनर्विकास आदीबाबत चर्चा झाली. कोळीवाड्यांचे सीमांकन लवकरच पूर्ण होईल, असे सांगत कोळीवाड्यांचे हक्क अबाधीत राहतील, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीवर आज सकारात्मक निर्णय झाल्याने कोळी बांधवांच्या संस्थांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले. बैठकीस मुंबई महापालिकेचे उपआयुक्त चक्रधर कांडळकर, कोस्टल रोडचे मुख्य अभियंता एम. एम. स्वामी, कोळी बांधवांचे प्रतिनिधी वेदांत काटकर, उज्वला पाटील, विजय वरळीकर, रॉकी कोळी आदी उपस्थित होते.



व्ही.के.हायस्कूल मित्र परिवार

# रत्नाकर पाटील, रुपाली शिंदे, राकेश भुजबळ स्वच्छता चॅम्पियन पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२३ अंतर्गत स्वच्छता चॅम्पियन पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. यावेळी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील, क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशनच्या अध्यक्षा रूपाली शिंदे, उत्कर्ष सांस्कृतिक कला, क्रिडा मंडळाचे अध्यक्ष राकेश भुजबळ यांना प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कार सोहळा पनवेल महापालिकेच्या प्रभाग 'ड' कार्यालयात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

यावेळी आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, प्रभाग 'ड' चे अधिकारी अमर पाटील, स्वच्छता निरीक्षक अनिकेत जाधव यांच्यासह पर्यवेक्षक रमेश गरुडे , नंदू जाधव, उत्तम चिखलेकर, संदीप जाधव, अंकुश पाटील, क्रांती चितळे, जयराज भोईर, असलम शेख आणि नागरिक उपस्थित होते.

# पोलादपूर येथील मोरगिरी पिकनिक पॉईंट येथे कातकरी आदिवासी बांधवासाठी शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाड उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड यांच्या अध्यक्षतेखाली पोलादपूर येथील मोरगिरी पिकनिक पॉईंट येथे श्रमजीवी संघटना महाड यांच्या सहाय्याने कातकरी आदिवासी बांधवासाठी (दि.१३ डिसेंबर २०२२) रोजी शिबीर संपन्न झाले.

यावेळी तहसिलदार पोलादपूर श्रीमती दिप्ती देसाई, गटविकास अधिकारी धनंजय बी.जगताप, वैद्यकीय अधिकारी, निवडणूक नायब तहसिलदार, आदिवासी विकास विभाग, पेण या कार्यालयाचे अधिकारी, श्रमजीवी संघटनेचे श्री.विठ्ठल कोळेकर तसेच इतर शासकीय विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर सर्व शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाकडील योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना सांगितली. या शिबिरात उपस्थित कातकरी आदिवासी बांधवांना १० शिधापत्रिका, ३६ निवडणूक (नवीन नाव नोंदणी), ३ लाभार्थ्यांना संजय गांधी योजना लाभ, ई-श्रम पोर्टलवर ३१ जणांची नोंदणी, ५१ दाखले वाटप, २३ उत्पनाचे दाखले, २८ जातीचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच ७२ आदिवासी बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली.


**NEELKANTH VISHWA PHASE-1 CO-OP.HSG SOC.LTD**

REGD.No.: RGD/PWL/HSG/(TC)/3853/2018-19/2008. Dated 04/07/2018

Survey No.139 & 140, Usarli-Khurd, Tal-Panvel, Dist-Raigad, Pin-410221

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the Share Certificate Nos.**80** of Ten ordinary shares bearing distinctive Nos.**791** to **800** of **NEELKANTH VISHWA PH-1 CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, USARLI-KHURD, PANVEL, DIST RAIGAD,** standing in the name of **MR.SUNIL PARASURAM TAKSANDE Flat No.G-204** has been reported lost / stolen and that an application to issue for a Duplicate Certificate in respect thereof has been made to the society at **NEELKANTH VISHWA PH-1 CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, USARLI-KHURD, PANVEL, DIST RAIGAD,** to whom objection, if any, against issuance of such duplicate Share Certificate should be made within 15 days from the date of publication of this notice. There is a loan balance of Rs.5.30 lakhs against the flat.

**Sd/-**
**Neelkanth Vishwa Phase-1 CHS. Ltd.**
**Secretary**



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अवकाळी पावसामुळे वाल जमीन धोक्यात

### आंबा, विटभट्टी व्यावसायिकांचेही नुकसान



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रोहा, सुधागड तालुक्यासह नागोठणे परिसरामध्ये अवकाळी पडलेल्या पावसामुळे वालाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच आंबा, बागायतदार व विटभट्ट्यांचेही अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतक–यांमध्ये व विट व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

बुधवार (दि.१४) रोजी दिवसभर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पाऊस पडण्याची शक्यता भरपुर प्रमाणात होती. पावसाने सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास नागोठणे, पाली आदी परिसरात पावसाने दमदार सुरुवात केली. पावसाची रिपरिप ही बराचवेळ चालुच होती. तसेच काही ठिकाणी विजेचासुद्धा खेळखंडोबा झाला होता. अवकाळी पावसामुळे सध्या जे शेतामध्ये वालाचे पीक तयार झाले होते ते पुर्णपणे खराब होण्याची भीती शेतकरी वर्गांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे दुबार वाल लागवडीची वेळ ही शेतक–यांवर येण्याची शक्यता आहे.

तसेच आंबा बागायतदार विटभट्टी व्यावसायिकांचेही या अवकाळी पावसाने नुकसान झाले असून काही विटभट्टी व्यावसायिकांनी विटांवरती ताडपत्री टाकून थोड्याफार प्रमाणात आपले नुकसान होण्याचे वाचवले आहे. त्याचप्रमाणे वातावरणातील वारंवार होणा–या बदलामुळे नागरिकांच्या आरोग्य बिघडण्याचे प्रमाण वाढले आहे.

यामध्ये अनेकांना ताप, सर्दी, खोकला, डोकेदुखी अशा आजारांना निमंत्रण द्यावे लागत असल्यामुळे अनेक दवाखाने फुल्ल असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# कबड्डी चषक स्पर्धेतील विजेत्या संघांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण संपन्न

## पुरुष गटात पांडवादेवी,रायवाडी तर महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स, पनवेल अंतिम विजेते

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली बुधवार, (दि.१४ डिसेंबर २०२२) रोजी पी.एन.पी. महाविद्यालय, वेश्वी, अलिबाग येथील क्रीडांगणावर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने रायगड जिल्हा प्रशासनाकडून आयोजित कबड्डी चषक स्पर्धा अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाली. सायंकाळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्या संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.



यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी(सा.प्र.) सर्जेराव म्हस्के पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम कोशेट्टी, तहसिलदार विशाल दौंडकर, डॉ.सतिश कदम, केदार शिंदे, जगन्नाथ वरसोलकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी, पीएनपी महाविद्यालयाचे विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

महिला गट–प्रथम – कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल, द्वितीय – भिल्लेश्र्वर क्रीडा मंडळ, किहीम, तालुका अलिबाग, तृतीय – टाकदेवी क्रीडा मंडळ, मांडवा, तृतीय – दत्तात्रेय स्पोर्ट्स पनवेल, पुरुष गट–प्रथम – पांडवादेवी रायवाडी , तालुका अलिबाग, द्वितीय – ज्ञानेश्वर कोळवे, तालुका पेण, तृतीय – बजरंग , रोहा, तृतीय – मरीदेवी, धेरंड. बक्षीस वितरण प्रसंगी अतिरिक्त जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत मार्गदर्शन केले. खेळाडूंनीही या स्पर्धेविषयी आपले मनोगत व्यक्त केले.


स्पर्धेतील प्रावीण्यप्राप्त संघांना (दोन्ही गट पुरुष आणि महिला )आकर्षक चषक, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक (प्रथम–३१ हजार, द्वितीय–२१ हजार, आणि तृतीय (२ संघांना) –११ हजार) देण्यात आले.

ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे तांत्रिक अधिकारी आणि स्पर्धा प्रमुख श्री.जनार्दन पाटील, श्री.जे. जे.पाटील, पी.एन.पी महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री.म्हात्रे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा अधिकारी सचिन निकम, सिद्धार्थ खंडागळे, प्रफुल, सुरेंद्र, अमित, पी.एन. पी महाविद्यालयाचे खेळाडू स्वयंसेवक, खेळाडूंना वैद्यकीय सुविधा देणारे अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉ.आशिष मिश्रा, डॉ.अजित बरगे व त्यांचे सहकारी आदी सर्वांचे सहकार्य लाभले.

# उरण येथे अय्यप्पा पूजा कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

सालाबाद प्रमाणे यंदाही श्री अय्यप्पा कल्चरल असोसिएशन उरण यांचं वतीने श्री राघोबा मंदिर कोट नाका उरण येथे अय्यप्पा पूजेचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे ३२ वे वर्षे आहे असे श्री अय्यप्पा कल्चरल असोसिएशन उरणचे सेक्रेटरी गोपाकुमार ए यांनी सांगितले.



या कार्यक्रमात पाहटे ५ वाजता गणपती होम, सकाळी ६. ३० वाजता अय्यपा देवाची प्राणप्रतिष्ठा, सकाळी ७.३० वाजता उषा पूजा, ११.३० वाजता मध्य पूजा, दुपारी १२ ते ३ वाजे पर्यंत महाप्रसाद, रात्री ८.३० वाजता आथाझा पूजा, रात्री ९.३० वाजता महादिपा आराधना, १०.३० वाजता हरीवर्सानम आदीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास श्री अय्यप्पा कल्चरल असोसिएशन उरणचे अध्यक्ष बाबुराज, सेक्रेटरी गोपा कुमाए, खजिनदार दीपक पिल्ले व सर्व सदस्या सहकार्य लाभणार आहे.

# शालेय गेट-टुगेदर (स्नेह मेळावा) करणे काळाची गरज : पत्रकार किशोर पितळे

**दै.रायगड नगरी । तळा**

१९७८ सालच्या एस एस सी बॅच तळा इंग्लिश स्कूल तळाचा स्नेह मेळावा ४० वर्षांनी २०१८ साली करण्यात आला होता. त्यानंतर कोरोना महामारी संक्रमणामुळे होऊ न शकल्याने गेट–टुगेदर (स्नेह मेळावा) चे आयोजन दिव्या–अवधूत फार्म हाऊस खांबोली येथे १४ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. प्रथम शारदादेवी स्तवन करून कार्यक्रमाची सुरूवात करून दिवंगत वर्ग बंधू कै.नारायण ठाकर छाया पाडळकर, शिक्षक कै.मा.वा.जोशी (सर) लावणी सम्राट सुलोचना चव्हाण, गान सम्राज्ञी लता दिदि मंगेशकर ज्ञात अज्ञात व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करून प्रास्ताविक केले.



यावेळी किशोर पितळे पत्रकार यांनी आपल्या मित्र–मैत्रिणीं सोबत मनोगत व्यक्त करताना म्हणाले की शालेय गेट–टुगेदर करणे ही काळाची गरज झाली असून आत्ताच्या आधुनिक युगात प्रत्येकमाणूस हा यंत्रासारखा फिरत असतो सतत व्यस्त असतो. शिक्षण, नोकरी, संसार, सेवानिवृत्ती व उतार वययामध्ये संपूर्ण आयुष्य जात असतं गेट–टुगेदर (स्नेह मेळावा) भरल्यामुळे आपल्या शालेय जीवनातील मित्र मंडळीला एकत्र आणून बालपणीच्या, शालेय जीवनातील, त्यानंतर आपण जीवनात केली प्रगती अनुभव व पती–पत्नीची होणारी ओळख यामधून एक वेगळा आनंद मिळत असतो व मैत्री बंध अधिक वृध्दींगत होण्यास मदत होते.

एकदिवस आपल्या मित्रमंडळींमध्ये घालवल्यामुळे अतिशय एक वेगळा आनंद आपल्याला मिळत असतो यासाठी प्रत्येक शालेय विद्यार्थ्यांनी गेट–टुगेदर किंवा स्नेही मेळावा घेऊन एक वेगळाआनंद लुटता येतो. यामध्ये ओळख परिचय, गप्पा टप्पा, खेळ, मनोरंजन, करून एक दिवस आपल्या संसारातून मित्र मैत्रीणीना मध्ये घालवून जीवनाचा खरा आनंद मिळतो. स्नेह मेळावा हि आधुनिक युगात काळाची गरज झाली झाली आहे. असे मत व्यक्त करून प्रतिवर्षी करावा असे आवाहन केले. यावेळी किशोर पितळे, सतीश साठे, लिलाधर खातू, कमळाकर चोरगे, विजय साठे, सुर्यकांत सांताबेकर, कृष्णा वावेकर, लक्ष्मण कांबळे, उल्का पवार, सुलभा वडके, गणपत पारावे, शरद चव्हाण, एकनाथ जाधव अशी कुटंब एकत्रीत येऊन स्नेह मेळाव्याचा आनंद लुटला.

# ताराबंदर येथील फणसाड अभयारण्य परिसरात जाळरेषा अभियान



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

फणसाड वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली अभयारण्य परीमंडळ क्षेत्रात बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील ताराबंदर रस्त्यालगत जाळरेषा अभियान राबविण्यात आले.

साधारणत: पावसाळा संपल्यानंतर हिवाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात दरवर्षी वनांना लागणारे वणवे ही चिंतेची बाब असून वनखात्याची डोकेदुखी ठरत असते. वनाना वणवे लागून होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी वनविभाग दरवर्षी उपाययोजना करीत असते. यावर्षी देखील वनांचे वनव्यांपासून संरक्षण व्ह–ावे, यासाठी मुरुडच्या फणसाड वन्यजीव अभयारण्यातर्फे अभयारण्य परीसरातील सीमारेषे लगत जाळरेषा आखण्याचा उपक्रम राबविण्यात येतो.

त्याचाच भाग अभ्यारण्य परीमंडळातील अलिबाग–मुरुड रस्त्यालगत बोर्ली ग्रामपंचायत हद्दीतील ताराबंदर येथील अभयारण्य रस्त्यालगत जाळरेषा काढण्याचे काम वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल शरद शिंदे, वनरक्षक रुपेश इंगोले, केरबा खांडेकर व वनमजूर यांनी केले.

# ई-चावडी, ई-फेरफार व ई-हक्क प्रणालीबाबत जिल्हास्तरीय प्रशिक्षण संपन्न

## ई-चावडी प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित करण्याचा जिल्हा प्रशासनाचा निर्धार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ई–चावडी प्रकल्पांतर्गत ई–चावडी प्रणाली विकसनाचे कामकाज असून अष्टसूत्री कामकाज पूर्ण असणाऱ्या गावांचा समावेश ई–चावडी प्रकल्पात करता येणार आहे. जिल्ह्यात प्रथम भाग अद्ययावतीकरण पूर्ण असणारी गावे निश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक जिल्ह्यात ई–चावडी प्रकल्प कार्यान्वित करता येईल.

या उद्देशाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार बुधवार, दि.१४ डिसेंबर २०२२ रोजी रिलायन्स टाऊनशिप नागोठणे येथे ई–चावडी, ई–फेरफार व ई–हक्क प्रणाली जिल्हास्तरीय प्रशिक्षण संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा राज्य संचालक, ई फेरफार प्रकल्प जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे श्रीमती सरिता नरके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी तथा DDE, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, सर्व नायब तहसिलदार (ई फेरफार), व प्रत्येक तालुक्यातील उत्कृष्ट कामकाज करणारे प्रत्येकी २ तलाठी व २ मंडळ अधिकारी आदि उपस्थित होते.

या बैठकीत ई–फेरफार व नव्याने विकसित ई–हक्क आज्ञावलीबाबत प्रशिक्षण व चर्चा झाली. या बैठकीसाठी प्रातांधिकारी ज्ञानेश्वर खुटवळ यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा तहसिलदार कविता जाधव यांनी उत्कृष्ट नियोजन केले. या जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला सर्व तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.



# जिल्हास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत मेहेंदळेची हायस्कूलची विजयाची हॅटट्रिक

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रा.जि.क्रीडा अधिकारी आणि संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव तालुका सुधागड यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या शालेय खो–खो स्पर्धेत मेहेंदळे हायस्कूलने आपल्या नावलौकिकास साजेसा खेळ करून विजयाची हॅटट्रिक साधली.

या स्पर्धेत मेहेंदळे हायस्कूलच्या कोएसोचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विजयाची घोडदौड कायम ठेवत सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळविला आहे. विद्यार्थी वर्गाने संपादित केलेल्या सुयशाबद्दल शाळा समिती चेअरमन संदीप गांगल, प्राचार्य रमेश मोसे, ज्येष्ठ शिक्षक व क्रीडाप्रेमी नारायण पानसरे, के आर पाटील, संग्राम गायकवाड आदींनी अभिनंदन करून विभागीय स्तरावर होणाऱ्या खो–खो क्रीडा स्पर्धेत देखील उत्तम कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान सर्व खेळाडूंना ज्येष्ठ शिक्षक नारायण पानसरे त्याचप्रमाणे शाळेतील शिक्षक अनिल तिरमले, मारुती लोहकरे, सुनंदा पाटील त्याचबरोबर शाळेचा माजी विद्यार्थी व खो–खो प्रशिक्षक विक्रांत शिंदे यांनी उत्तमरीत्या मार्गदर्शन करत सहकार्य केले.

वरील स्पर्धेतील बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी, भोराई शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश शेठ खैरे, गटशिक्षणाधिकारी साधूराम बांगारे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रिडा मार्गदर्शक मनिषा मानकर, नांदगाव कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संभाजी ढोपे आदींनी विभागीय स्तरा–वरील खो–खो स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या मेंहेंदळे हायस्कूलच्या संघाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




**PUBLIC NOTICE**

This public notice is given to inform all SUB-REGISTRAR Offices, All Courts, Etc. Cancellation of power of attorney for admission which was register on Date: - (08/03/2021). With Sub-Registrar office name: - (BOM5_JT SUB REGISTRAR MUMBAI 5) Under BDR No: - 5-3059/2/15-2021. Now Cancelled / Revoked/Terminated Only Cancellation As Per Old Power and PUBLIC NOTICES in Newspaper Named Vadalwara and Newspaper Named Raigad Nagari form 23/11/2022 to 26/11/2022 full details given in two newspapers document police verification done as no future power was given to any of the parties. This is to inform all Sub-Registrars offices that the power is cancelled/revoked and no further power given to parties. (All Parties Agree). (If Any Objection Contact: - 9820636968).



**मा.श्री.सोनावणे साहेब**

**ॲड.धर्मनाथ नामा गोंधळी**
**ॲड.शोभा धर्मनाथ गोंधळी**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

चौ.अर्ज क्र.१८२१/२०२२

सुरींदर सिंग बलबीर सिंग पास्कॅलिया अर्जदार

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील/आई कै. सुरजित कौर बलबीर सिंग ह्या दि.७/०९/२००८ रोजी मृत्यू पावल्या आहेत. त्यांची मौजे : कळंबोली येथे खालील वर्णनाची मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र/किंमत |
|---|---|---|
| कै.सुरजित सिंग बलवीर सिंग पास्कॅलिया | शॉप नं.३४, तळमजला, शिवम को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.१२, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड | १६.०० चौ.मी. रु.१९,५०,०००/– |

वरील मिळकतीचे कोणतेही साठेकरार विक्रीकरार फरोक्त खत, गहाणखत, बक्षिसपत्र असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी अगर तोंडीहरकत घ्यावयाची आहे. वरील मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.गुरुनाथ दत्ता भगत**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो.वर्ग १ यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१३६६/२०२२
नि.नं.७
ने.ता.१८/०१/२०२३

श्रीमती.कलावती उत्तमराव मोहिते
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.के.एल–४, बिल्डींग नं.७४, रुम नं.३,
से.४ ई, कळंबोली नोड, पो.कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन–४१०२१८
मो.क्र.९७०२०८३२५१ अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
नावडे विभाग
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
ऑफिस–नावडे गाव, पो.नावडे,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती.कलावती उत्तमराव मोहिते, रा.के.एल–४, बिल्डींग नं.७४, रुम नं.३, से.४ ई, कळंबोली नोड, पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, पिन–४१०२१८ यांच्या सासुचा मयत अंजना महादजी मोहिते यांचा मृत्यू दि.०२/०८/१९९८ रोजी मुक्काम पडघे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला असून अर्जदार त्यांच्या सासुचा मृत्यूच्या नोंदीचा आदेश मिळण्यास मा.न्यायालयात फौ.चौ.अर्ज नं.१३६६/२०२२ अर्ज दाखल केला असून सदर अर्जास अर्जदारांच्या सासुच्या मृत्यूच्या नोंदणी संदर्भात कोणासही कसलीही हरकत घ्यावयाची असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदरील न्यायालयात हरकत नोंदवावी. सदरील दिवसात कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास अर्जदाराचे लाभात मा.न्यायालय योग्य तो आदेश करेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया., पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया., पनवेल**



**मा.मुजावर साहेब कोर्ट**

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.एस.व्ही.क्षीरसागर, ॲड.एस.व्ही.पवार**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८०६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०१/२०२३

१) श्री.विनय मारुती माटेकर
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.शुभ शिवम, सी–७०२, प्लॉट नं.४०,
सेक्टर–११, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.विजय मारुती माटेकर
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.शालन मारुती माटेकर
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
दोघे रा.माटेकरवाडी, कुंभारगांव,
सातारा, पिनकोड ४१५१०३ अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.मारुती विठ्ठल माटेकर हे रा.माटेकरवाडी कुंभारगांव, सातारा, ४१५१०३ येथील रहिवाशी होते व ते दि.२७/०८/२०२१ रोजी रुरल हॉस्पिटल काशीळ, सातारा येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी श्री.विनय मारुती माटेकर व इतर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मिळकतीचे तपशिल |
|---|---|
| १ | सर्वे नं.१००/१/२, सदनिका क्र.२०८, दुसरा मजला, ई–विंग, ''अक्षर रिवरगेट'' बिल्डींग, चावणे, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र २५.६०० चौ.मी. |

वरील अर्जदार हे मयत कै.मारुती विठ्ठल माटेकर हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.राजदूत भागवत शिंदे यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१५/१२/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# महाड पूर मुक्त करण्यासाठी नियोजनबद्ध उपाय योजनांकरिता निधी कमी पडणार नाही : आ. भरतशेठ गोगावले

## ५ महिन्यात २५ लाख क्युबिक मीटर गाळ काढण्याचे नियोजन

**दै.रायगड नगरी । महाड**

जुलै २०२१च्या महाप्रलयानंतर गतवर्षी महाड तालुक्यातील सावित्री, काळ, गांधारी व उपनद्यांमधील १० लाख क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला त्यामुळे २०२२च्या पावसाळ्यात महाडकरांना पुराचा त्रास झाला नाही. यावर्षी जानेवारी महिन्यापासून महाड पोलादपूर तालुक्यातील नद्यांमधील गाळ काढण्यास पाटबंधारे खात्यामार्फत सुरुवात केली जाणार असून पावसाळ्यापूर्वी २५ लाख क्युबिक मीटर गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी राज्याच्या पुर्नवसन विभागाचे सचिव असीम गुप्ता यांचे समवेत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांसोबत झालेल्या बैठकीत ३१ कोटी निधीची आवश्यकता भासणार असून दरमहा ५ कोटी निधी देण्याचे आश्वासन गुप्ता यांनी दिले आहे. त्याचप्रमाणे दरडग्रस्त गावांच्या स्थलांतरासाठी सुरक्षित निवारा शेडसाठी निधीची तरतूद करण्यात आली असून राज्यात असणारे शिंदे - फडणवीस सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार असल्याने महाड शहरासह तालुक्यातील पूरग्रस्त व दरडग्रस्त गावांना भयमुक्त करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या नियोजनबद्ध उपाय योजनांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही शिंदे गटाचे प्रतोद व महाडचे आ. भरतशेठ गोगावले यांनी दिली.



महाड तालुक्यातील नद्यांमधील गाळ काढण्यासाठी पुर्नवसन विभागाचे सचिव असीम गुप्ता यांचे सोबत झालेल्या बैठकीतील निर्णयाची माहिती महाडकर व महाड पूर निवारण समितीला देण्यासाठी व त्यांच्या काही सूचना असतील तर त्या जाणून घेण्यासाठी महाड प्रांत कार्यालयात प्रांताधिकारी पुदलवाड, पाटबंधारे विभागाच्या कोलाड येथील कार्यकारी अभियंता श्रीम. राजभोग, महाड तहसिलदार काशिद, पोलादपूर तहसिलदार देसाई, महाड मुख्याधिकारी रोडगे यांचे उपस्थितीत एका बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ. गोगावले यांनी बैठकीतील निर्णयाची माहिती उपस्थितांना दिली.

आ. गोगावले यांनी महाड शहर व तालुक्यातील नदी किनारी असलेल्या गावांमध्ये पूर येऊ नये यासाठी संरक्षक भिंत बांधण्यासाठी ६५ कोटी निधीची गरज असून ही भिंत बांधताना कुठलीही गांवे पाण्यात बुडणार नाही याचा अभ्यास करून आवश्यक त्या ठिकाणीच संरक्षक भिंत बांधण्यात येईल असे सांगितले. मुख्यमंत्री उद्या रत्नागिरी दौर्यावर असून त्यांची भेट घेऊन महाडला आपत्ती पासून भय मुक्त करण्यासाठी आवश्यक नियोजनबद्ध उपाय योजनांसाठी लागणार्या निधीची मागणी करणार असून हिवाळी अधिवेशनानंतर महाड पूर समिती सदस्य व अन्य तज्ञ मंडळींची मुख्यमंत्र्यां सोबत बैठक घडवून आणून दासगांव येथील कोकण रेल्वे पुल व अन्य उपाय योजनांसंदर्भात केंद्राकडे पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे अभिवचन दिले. शासन व प्रशासन महाडकरांना आपत्तीपासून मुक्त करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत असून जनतेनेही त्यांना सहकार्य करावे असे आवाहन आ. गोगावले यांनी केले.

यावेळी सिस्केप संस्थेचे प्रमुख सागर मेस्त्री व इतिहास संशोधक अंजन धनावडे यांनी नद्यां मधील गाळ काढताना तज्ञांचा सल्ला घ्यावा त्याच प्रमाणे सावित्री नदीतील बेटांवर असलेला मगरींचा अधिवास धोक्यात येणार नाही याची काळजी घ्यावी असे सुचवले.

माजी नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, माजी नगरसेवक सुनिल अगरवाल यांनी महाडच्या विकास आराखड्यातील रस्ते करण्यासाठी लागणार्या भरावासाठी नदीतील गाळ वापरावा अशी सुचना केली. तर अँड सुरभी मेहता यांनी नदीतून काढलेल्या गाळ कुठे टाकणार व तो कसा उचलणार याचे नियोजन करावे असे सुचवले. माजी नगराध्यक्ष नितीन पावले यांनी महाडला पूर मुक्त करण्यासाठी आ. गोगावले, प्रांताधिकारी पुदलवाड, व त्यांचे सहकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

मोहन शेठ यांनी पूर न येण्यासाठी शासन प्रशासनाकडून केल्या जाणार्या उपाययोजना पुढील ५ - ६ महिने थांबणार नाहीत याची दक्षता घ्यावी काही चुका व त्रुटी असतील तर त्यासाठी आंदोलनाचे हत्यार न उपसता अधिकार्यांकडे त्या त्रुटी दूर करण्याच्या सूचना कराव्यात असे सांगितले.

# संक्षिप्त...

## रेल्वेची ठोकर लागून इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन ते कळंबोली रेल्वे स्टेशन दरम्यान गोरखपूर एक्सप्रेस गाडीची ठोकर लागून एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस मृताच्या नातेवाईकाचा शोध घेत आहे.

सदर इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे असून उंची ५ फूट १ इंच, अंगाने सडपातळ, रंग - गहूवर्ण, चेहरा - गोल, नाक - बसके, डोकीस केस पुढील बाजूने अर्धवट टक्कल काळे वाढलेले, दात - शाबूत आहे. तसेच अंगात निळ्या सफेद व भगव्या रंगाचा हाफ टी शर्ट आणि निळ्या रंगाची जिन्स पेन्ट आहे. सदर इसमाबाबत कोणालाही काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे फोन नं. ०२२ - २७४६७१२२ किंवा सहा पोलीस निरीक्षक बी.व्ही. दोडमिसे (मो.९५०३७५८२८४) यांच्याशी संपर्क साधावा.

## मोटारसायकल नाल्यात पडली, स्वार थोडक्यात बचावला

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर - दिघाटी रस्त्यावरुन वेगात जाणारी मोटारसायकल चिरनेर गावाजवळील नाल्यात पडल्याची घटना गुरुवारी ( दि१५) घडली आहे.सदर अपघातात मोटारसायकल स्वार थोडक्यात बचावला आहे.

खोपटा गावातील एक तरुण आपल्या मोटारसायकल वरून चिरनेर - दिघाटी रस्त्यावरुन वेगात जात असताना सदर मोटारसायकल स्वाराला आपली गाडी न सावरल्याने सदर मोटारसायकल चिरनेर गावाजवळील नाल्यात पडल्याची घटना गुरुवारी ( दि.१५) सकाळी घडली आहे. सदर अपघातात मोटारसायकल स्वार थोडक्यात बचावला असून त्यांच्या वर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । कर्जत**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात मोठे वेणगाव मधील तरुणांचा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत जाहीर प्रवेश केला आहे.

ग्रुप ग्रामपंचायत मोठे वेणगाव येथील युवानेते प्रशांत शिंदे यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश झाला असून या प्रवेशाच्या वेळी उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत लागेल ती मदत आपल्या सर्वांना केली जाईल असे आश्वासन दिले. मोठे वेणगाव गावातील या युवकाचा प्रवेश ग्रामपंचायत मोठे वेणगाव ला नवसंजीवनी देणारे ठरणार असून येणाऱ्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यास मदत करणारे आहे असा विश्वास व्यक्त केला. कर्जत तालुकातील अनेक गावातील तरुणांचा ओघ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे दिसून येत आहे. नितीन सावंत यांनी उपजिल्हाप्रमुख पदाची सूत्र हाती घेतल्यापासून पक्षवाढीसाठी जातीने लक्ष घातले आहे.

या पक्ष प्रवेशाला उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड.संपत हडप, ग्राहक संरक्षण कक्ष तालुका प्रमुख उमेश सावंत, विभाग प्रमुख कुमार बोराडे, माजी सभापती पंढरीनाथ राऊत, मोठे वेणगाव शाखाप्रमुख संदेश पेठे, चांधई शाखाप्रमुख रघुनाथ कोळंबे,मोठे वेणगाव उपशाखाप्रमुख रोहिदास पालकर त्याच बरोबर शिवसैनिक आणि युवासैनिक समीर पेठे, वैभव पेठे, स्वप्नील पेठे, साईल गोरे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# खारघरमध्ये कारची चोरी; घटना सीसीटीव्ही कैद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने वसाहतींमध्ये लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सध्या वेलपर्णीमुळे विळख्यात अडकल्याने चोरट्यांचे फावले आहे. त्यामुळे चोरट्यांना कसे पकडावे असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे.



खारघर वसा-हतीतील सेक्टर १० मधून नुकतेच पहाटेच्या सुमारास सफेद रंगाची मारुती बलेनो गाडी क्र. एम एच एबी ८८०८ ची चोरी झाली. त्याच दिवशी सेक्टर २० मधून राखाडी कलरची स्विफ्ट डिझायर कार क्र. एम एच ४६ एल ८७९२ ची सुद्धा चोरी झाली. या कार चोरीचा व्हिडियो सिसिटीव्ही मध्ये कैद झाला मात्र सीसीटीव्ही कॅमेरे समोर असलेल्या वेलपर्णीमुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे.

चोरट्यांचे अंधूक व अस्पष्ट चित्र कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याने चोरट्यांना पकडावे कसे, असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे. सदर व्हिडीओमध्ये कार चोरी करणारा चोरटा चोरी करण्या करता दुसऱ्या कारचा वापर करत अवघ्या तीन ते चार मिनटात गाडीची काच तोडून चोरटा गाडी घेऊन पसार झाला.

# कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये रायगड जिल्हा पोलीस दलास विजेतेपद प्राप्त



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय येथे पार पडलेल्या कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेत रायगड जिल्हा पोलीस दलाने पदकांचे शिखर सर करीत सर्व-साधारण विजेते पदावर आपले नाव कोरले आहे.

दरवर्षी पार पडल्या जाणाऱ्या हया कोकण परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा सन २०२२ चे यजमानपद नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे भुषविण्यात आले होते. त्याकरीता कोकण परिक्षेत्रा मधुन रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबईच्या पोलीस दलातर्फे पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी सांघिक तसेच वैयक्तीक खेळ प्रकारात आपली कुमक दाखवित आपला सहभाग नोंदविला. क्रिडा स्पर्धेतील सांघिक प्रकारामध्ये हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॅन्डबॉल, कबड्डी, खो-खो, क्रॉसकंट्री तसेच वैयक्तीक प्रकारामध्ये कुस्ती, ज्युदो, वेट-लिफ्टींग, जलतरण, बॉक्सींग, ॲथलेटीक्स, वू-शो, तायक्वांडो अशा वैयक्तीक खेळ प्रकारांचा समावेश होता.

रायगड जिल्हा पोलीस दलातर्फे मा.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनानुसार अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या अधिपत्याखाली ७ पोलीस अधिकारी व११९ पोलीस अंमलदार यांनी आपल्या कामगिरीमध्ये चमक दाखवित सांघिक खेळ प्रकारात ८ पैकी ७ मध्ये प्रथम व १ व्दितीय क्रमांक प्राप्त केले तसेच वैयक्तीक खेळ प्रकारामध्ये १३३ सुवर्ण पदक, ५७ रजत पदक, ५७ कांस्य पदकांच्या कमाई अशा एकुण २२४ गुणांसह रायगड जिल्हयाने सर्व-साधारण जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. सदर कामगिरी राखिव पोलीस उप-निरीक्षक जुनेद शेख व गेम इंचार्जपोना/ ऋषीकेश साखरकर यांनी नेतृत्व केले आहे.

रायगड जिल्हा पोलीस दलातील खेळाडूंनी अथक परिश्रमाने प्राप्त केलेल्या यशाने रायगड जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तब्बल १२ वर्षानंतर रायगड जिल्हा पोलीस दलाने कोकण परिक्षेत्रीय स्पर्धेमध्ये विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. खेळाडूंनी केलेल्या हया उल्लेखनिय कामगिरीचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून कौतुक केले आहे व भविष्यात देखील अशीच कामगिरी करावी अशी अपेक्षा व्यक्त करून भविष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

# उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांचा सुवर्ण महोत्सवी वाढदिवस साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष व तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांचा ५० वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ५० मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.




यावेळी रायगडच्या माजी पालकमंत्री आ आदिती तटकरे, नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, सर्व नगरसेवक व नगरसेविका, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, भाजपचे प्रदेश सरचिटणीस रविभाऊ मुंढे, बाळासाहेबांची शिवसेना शहर अध्यक्ष राकेश वडके, तळा नगरपंचायतीच्या विरोधी पक्षनेत्या नेहा पांढरकामे, गो म वेदक विद्यालयाचे चेअरमन महेंद्र कजबजे, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्रीराम कजबजे, शिवसेना नेते लिलाधर खातू, ॲड उत्तम जाधव, ॲड चेतन चव्हाण, ॲड रोशन पांढरे, राष्ट्रवादी, शिवसेना, बिजेपी आदी पक्षाचे कार्यकर्ते, पत्रकार, व्यापारी, डॉक्टर, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी चंद्रकांत रोडे यांचा केक कापून वाढदिवस साजरा केला. व त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. चंद्रकांत रोडे यांचा दिनांक १४ डिसेंबर १९७२ रोजी जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तळा येथील दगडी शाळा, माध्यमिक शिक्षण श्री गोपिनाथ महादेव वेदक विद्यामंदिर तळा तर महाविद्यालयीन शिक्षण माणगाव येथे झाले. सन १९९४ मध्ये तळा ग्रामपंचायतच्या सदस्यपदी निवडून आले. १९९९ ला दुसऱ्यांदा ग्रामपंचायत सदस्यपदी निवड, सन २००२ मध्ये उपसभापती, २००५ मध्ये सभापतीपदी निवड तर २००७ मध्ये दुसऱ्यांदा सभापतीपदी निवड झाली. सन २०१६ मध्ये तळा नगरपंचायतीच्या स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती तर २०२१ मध्ये तळा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदाची माळ चंद्रकांत रोडे यांच्या गळ्यात पडली. त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विविध पदे भूषविली. त्यांचे स्वपक्षासह इतर राजकीय पक्षा-तील पदाधिकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याचे मान्यवरांनी सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन चंद्रकांत रोडे मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. सूत्रसंचालन सुहास वावेकर यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व चंद्रकांत रोडे यांचा जीवनप्रवास या विषयावर पत्रकार डी टी आंबेगावे यांनी तयार केलेला माहितीपट दाखवण्यात आला.

# श्रीवर्धन परिवहन आगाराच्या बसने विद्यार्थ्यांना सहलीला पाठवताय, पालकांनो सावधान!

## आगाराकडून बस योग्य असल्याची खात्री करूनच पाठवा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळा आहेत. त्याचप्रमाणे अनेक कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालये सुद्धा आहेत. डिसेंबर व जानेवारी महिन्यात विविध शाळांच्या व महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहली आयोजित केल्या जातात. श्रीवर्धन तालुक्यात खाजगी लक्झरी बसेसची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे बहुतांश शाळा व महाविद्यालये राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच सहलींसाठी बुक करतात. परंतु श्रीवर्धन आगारात असलेल्या बहुतांश बसेस या भंगार अवस्थेत असून लांब पल्या साठी जाण्या योग्य नसल्याचे समोर येत आहे.



पंधरा दिवसांपूर्वी मिरज श्रीवर्धन या बसचा म्हसळे दिघी मार्गावरती मागील दोन चाके निखळल्यामुळे अपघात होता होता वाचला होता. तर काल दुपारी श्रीवर्धन आगारातून सुटणारी श्रीवर्धन पुणे या बसची देखील मागची दोन चाके वडघर पांगलोली गावाजवळ निघाल्याने मोठी खळबळ उडाली होती. श्रीवर्धन आगारामध्ये मेकॅनिक तसेच अन्य डेपो मधील कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असल्यामुळे गाड्यांची कामे वेळेवर केली जात नाहीत. तसेच आज मितिला ज्या गाड्या आगारामध्ये उपलब्ध आहेत त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक गाड्यांची रोज दुरुस्तीची कामे करावी लागत आहेत. मुंबई मार्गावरती जाणाऱ्या गाड्यांना जास्त घाट रस्ता नसल्यामुळे त्या गाड्या जेमतेम फेऱ्या मारतात. परंतु सातारा, पुणे, मिरज या मार्गावरती जाणाऱ्या गाड्यांना मोठमोठे अवघड घाट पार करत जावे लागते. मागील अनेक वर्षांपासून श्रीवर्धन आगारामध्ये एकही नवीन गाडी राज्य परिवहन महामंडळाने दिलेली नसल्याने अशा प्रकारची परिस्थिती उद्भवलेली आहे. शाळा व महाविद्यालयांच्या बहुतांश सहली या महाबळेश्वर, प्रतापगड, कोल्हापूर, तुळजापूर, अजंठा, वेरूळ,नाशिक, जेजुरी अशा ठिकाणी आयोजित केल्या जातात. या मार्गांवरून सहलीच्या गाड्या जाताना संपूर्णपणे घाट रस्ता असल्याने गाड्यांची अवस्था अत्यंत सुस्थितीत असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना सहलीला पाठवायचे की नाही याबाबतचा निर्णय पालकांनी महामंडळाच्या बसेसची अवस्था पाहून घ्यावा. त्याचप्रमाणे विविध शाळा व महाविद्यालयाच्या शिक्षकांनी देखील श्रीवर्धन आगारातून सहलीसाठी मिळणारी गाडी ही पूर्णपणे सुस्थितीत आहे का? याची खात्री करूनच सहल आयोजित करावी. डिसेंबर महिन्यात आत्तापर्यंत पार पडलेल्या सहली सुखरूप पणे पार पडलेल्या असल्या तरीही, मागील काही दिवसांपासून श्रीवर्धन आगारातील गाड्यांची अवस्था पाहता अनेक वेळा गाड्यांचे ब्रेक लागत नाहीत. अनेक वेळा गाड्या रस्त्यात ब्रेक डाऊन होतात. या सर्व प्रकारांमुळे आपल्या पाल्यांना सहलीसाठी पाठवायचे की नाही अशी द्विधा मनस्थिती पालकांची झालेली पाहायला मिळते. जर श्रीवर्धन आगारामध्ये सुस्थितीतील बस उपलब्ध नसतील, तर पेण विभागीय कार्यालयाकडून अन्य आगारातील सुस्थितीत असलेल्या बस श्रीवर्धन आगाराने सहलीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी पालक वर्गांमधून केली जात आहे.